Reliance
Industrial Infrastructure Limited

नोंदणीकृत कार्यालय: एन के एम इंटरनॅशनल हाऊस, ५वा मजला, १७८ बॅकबे रिक्लमेशन, एल् आई सी योगक्षेमा बिल्डिंगच्या मागे, बाबुभाई चिनाय मार्ग, मुंबई - ४०० ०२०
दूरध्वनी: ०२२-४४७७ ९०५३ • फॅक्स: ०२२-४४७७ ९०५२ • ईमेल: investor_relations@riil.in
CIN: L60300MH1988PLC049019

सूचना

सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस) नियम, २०१५ (लिस्टिंग नियम) मधील कलम ४७ सोबत वाचले असता कलम २९ अन्वये ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाहीच्या/अर्ध वर्षाच्या कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर विचार करण्यासाठी आणि त्यास मंजुरी देण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा **बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०** रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सदर सूचना कंपनीच्या वेबसाईटवर **http://www.riil.in** येथे उपलब्ध आहे आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटस वर **http://www.bseindia.com** आणि **http://www.nseindia.com** येथे देखील उपलब्ध आहे.

रिलायन्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/-
शैलेश ढोलकिया
कंपनी सचिव आणि कम्पलायंस ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ७ ऑक्टोबर, २०२०

www.riil.in

जाहीर सूचना

सूचित करण्यात येते की **१) श्रीमती स्मिता हर्षसूदन पुरेचा आणि २) श्री. हर्षसूदन एच. पुरेचा हे हंश प्रिया को-ऑप. हाउसिंग सोसायटी लिमिटेड** (इथून पुढे सदर सोसायटी) पत्ता प्लॉट क्र. १३२, ६२वा रस्ता, टीपीएस III, ऑफ फॅक्टरी लेन, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ चे संयुक्त मालक आणि सदस्य होते आणि प्लॉट क्र. १३२, ६२वा रस्ता, टीपीएस III, ऑफ फॅक्टरी लेन, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ येथे स्थित **''हंश प्रिया''** नावाच्या इमारतीतील **५व्या मजल्यावरील ११३२ चौ. फूट बिल्ट-अप** एरिया मोजमापित **सदनिका क्र. ५०३** या निवासी जागेच्या आणि स्टिल्ट पार्किंग क्र. ९ च्या अधिकार, मालकी आणि हितसंबंधाचे प्रत्येकी ५०% धारक होते. सदर **१) श्रीमती स्मिता हर्षसूदन पुरेचा** यांचा मृत्यु दिनांक १८.०९.२०१७ रोजी मुंबई येथे, आणि **२) श्री. हर्षसूदन एच. पुरेचा** यांचा मृत्यु दिनांक १७.०१.२०११ रोजी मुंबई येथे कायदेशीर मृत्युपत्र न करता झाला (ज्यांना इथून पुढे सदर मृतक म्हटले जाईल). या दोघांच्या एकमेव कन्या **श्रीमती वैशाखी राल्फ डीसूझा,** पूर्वाश्रमीच्या **सुश्री वैशाखी हर्षसूदन पुरेचा,** या आहेत ज्या आमच्या अशील असून सदर मृतकांच्या एकमेव कायदशीर वारस आहेत.

आम्ही याद्वारे इतर वारस किंवा इतर दावेदार/आक्षेपकांना सूचित करत आहोत की त्यांनी सदर मृतक सदस्यांचे सोसायटीच्या भांडवली मिळकतीतील सदर शेअर्स व हितसंबंध हस्तांतरित करण्याविषयी असलेले दावे किंवा आक्षेप त्यांच्या दाव्यांच्या/आक्षेपांच्या समर्थनात कागदोपत्री व इतर पुराव्यांनिशी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत कळवावे. उपरोक्त अवधिमध्ये दावे/आक्षेप न मिळाल्यास आमच्या अशील **श्रीमती वैशाखी राल्फ डीसूझा,** पूर्वाश्रमीच्या **सुश्री वैशाखी हर्षसूदन पुरेचा,** या सोसायटीशी संपर्क करतील आणि सोसायटीच्या पोटनियमांनुसार सदर अधिकार आणि शेअर्सचा व्यवहार करण्यास आणि आमच्या अशील **श्रीमती वैशाखी राल्फ डीसूझा,** पूर्वाश्रमीच्या **सुश्री वैशाखी हर्षसूदन पुरेचा** यांना सदर सदनिका व सदर शेअर्सच्या मालक घोषित करण्यास सोसायटी स्वतंत्र असेल. त्या नंतर प्राप्त कोणत्याही दावा सूचनेला अधित्याग केलेले किंवा अवैध दावा मानले जाईल आणि **श्रीमती वैशाखी राल्फ डीसूझा,** पूर्वाश्रमीच्या **सुश्री वैशाखी हर्षसूदन पुरेचा** यांची सदर सदनिका आणि उपरोक्त उल्लेखित शेअर्सच्या मालक या रूपात पुष्टि केली जाईल.

व्हीएसके असोसिएट्स
सही/-
कृष्णा पॅलेस, साईधाम मंदिराशेजारी, पश्चिम द्रुतगती महामार्ग, कांदीवली (पूर्व), मुंबई-४००१०१

ठिकाण: मुंबई
तारीख : ०८.१०.२०२०

PUBLIC NOTICE

Under the instructions and information from my client, notice is hereby given that my client is negotiating with (1) Mr. Mangilal R. Jain & (2) Mrs. Anisha Bhavesh Jain, residing at Vile-Parle (East), Mumbai-400 057, for purchasing land situated Village Tungarli, within Limits of Lonavla Municipal Council, Taluka Mawal, District Pune and more particularly described in the Schedule hereunder.

Any Person/s having any claim or right, title, and interest and demand of whatsoever into or upon or in respect of the said Plot , is hereby required to make the same known in writing along with all Original documents to the under signed at his office at 38, Ward 'C', Opp. Bus Stop, S. P. Road (Station Road), Lonavla 410 401, within the period of 07 days from the date hereof at the expiration of which, it shall be presumed that such person/s claiming or having any such claim right, title and interest have willfully waived or abandoned and the sale will be completed without any regard to any such claim/s.

SCHEDULE

ALL THAT pieces or parcels of land situate lying and being at Village Tungarli, Taluka Maval in the Registration Sub-District of Maval and District Pune and within the limits of Ward Tungarli of Lonavla Municipal Council bearing Plot No.11, being the portion of sanctioned layout of Survey No.19/2+3 and Survey No.20/1+2, admeasuring 1082 sq. meters, and surrounded as follows:

On or towards the East:
By R.S.No.20, Hissa No.3;
On or towards the South:
By Plot No.12;
On or towards the West:
By Internal Layout Road;
On or towards the North:By Plot No.10;

Adv. Chetan M. Pandya
38, Ward 'C', Opp. Bus Stop, S.P. Road (Station Road), Lonavla 410 401, Taluka Mawal, Dist Pune.

सूचना

श्री. कांतिलाल चुनिलाल टोगनी हे आदित्य टॉवर को-ऑप. हौ.सोसा.लि. ज्याचा पत्ता आहे सदानंद वाडी, व्ही.पी. रोड, सिक्का नगर समोर, गिरगाव, मुंबई-४०० ००४ चे सभासद आहेत आणि सोसायटी बिल्डिंगमधील बी-विंग मधील फ्लॅट क्र. १९०२ मधील ५०% शेअर्सचे धारक असून त्यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता २३.१२.२०१८ रोजीस निधन झाले. श्री. वर्धमान कांतिलाल टोगनी यांनी त्यांच्या नावावर कै. श्री. कांतिलाल चुन्निलाल टोगनी यांचे ५०% शेअर्सच्या हस्तांतरण/हस्तांतरकरीता सोसायटीला अर्ज केला आहे.

सोसायटी याद्वारे सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे सदर शेअर्स आणि हितसंबंधाचे हस्तांतर होण्यास वारस किंवा वारसदार किंवा इतर दावेदार/आक्षेपदार किंवा आक्षेप घेणारे यांच्याकडून दावे किंवा आक्षेप असल्यास ते सदर सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसात सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्या/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्यांच्या प्रतींसह मागवित आहे. वर दिलेल्या मुदतीत जर दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीमधील दिलेल्या मार्गाने सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतर करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधीची प्रत दावेदार/आक्षेपकांद्वारे निरीक्षणासाठी सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सन्मा. सचिव यांचेकडे स. १० वा. ते सायं. ५ वा. च्या मध्ये सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून तिच्या कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत उपलब्ध आहे.

आदित्य टॉवर को-ऑप.हौ.सोसा.लि.
च्या वतीने आणि करिता
सन्मा. सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०८.१०.२०२०

जाहीर सूचना

कु. कश्मीरा नवल सतांक (विक्रेता) या दिवंगत श्रीम. मानी सपाल दलाल यांच्या अंतिम मुखत्यारपत्र व नामनिर्देशन दि. २७.०६.२०१६ अंतर्गत एकमेव लाभार्थी व कार्यकारी आहेत. मुखत्यारपत्र व नामनिर्देशन याचिका क्र. १९६४/२०१६ मध्ये जारी आदेश दि. २९.०७.२०१७ अंतर्गत सन्मा. न्यायालय मुंबई यांनी खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत जागेच्या (यापुढे जागा म्हणून संदर्भित) संदर्भातील दिवंगत श्रीम. मानी सपाल दलाल यांच्या सदर मुखत्यारपत्राचे प्रोबेट मंजूर केले आहे. सदर जागा खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत फ्लॅट व गॅरेज यांच्या (वहिवाट जागा) (जागा व वहिवाट जागा यापुढे एकत्रितरित्या मालमत्ता म्हणून संदर्भित) संदर्भात त्यांच्या वहिवाट हक्क यांच्या ऐंवजी परमनन्ट अल्टरनेट अकोमोडेशन करार दि. ३१.०३.२०१० अंतर्गत मालकी हक्क आधारावर यझारिना इस्टेट्स ॲन्ड इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लि. (आता कीस्टोन रियाल्टर्स प्रा. लि.) यांच्याद्वारे सदर श्रीम. मानी सपाल दलाल यांना आवंटित केली होती. विक्रेता यांनी माझे अशील यांना त्या सदर स्वरूपातील सदर जागेच्या अधिकारी व ताबधारक व कब्जाधारक आहेत असे सादर केले आहे. विक्रेता यांनी सदर जागेच्या विक्रीकरिता माझे अशील यांच्यासह एमओयू मध्ये प्रवेश करावा. सूचना याद्वारे देण्यात येते की, कोणाही व्यक्तीस कोणतेही हक्क, अधिकार, इस्टेट वा हितसंबंध असल्यास तसेच करार, मागण्या, वारसा, शेअर, विक्री, गहाण, हस्तांतरण, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, सुविधाधिकार, भेट, परवाना, देणगी, ताबा, भाग, खाटला, करार, हुकूम, जप्ती, आदेश करार, आदेश, ताबा, वारसा, विकास हक्क, खाटला, अदलाबदल, ताबा वा अडथळे वा अन्य काही असल्यास त्यांनी सदर मालमत्ता वा कोणत्याही भागाच्या संबंधात याद्वारे अधोहस्ताक्षरित यांना त्यांचे कार्यालय पत्ता फ्लॅट क्र. ३, रूपल अपार्टमेंट्स क्र. १, दादासाहेब फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई - ४०० ०१४ येथे संपूर्ण दस्तावेज पुरावे यांच्यासह सदर प्रसिद्धी तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सूचना द्यावी व ईमेल heresh52@gmail.com करावा अन्यथा सदर हक्क वा दावे, काही असल्यास ते अधित्यागीत व/वा परित्यागीत मानले जातील.

अनुसूची (मालमत्तेचे विवरण)

फ्लॅट क्र. १०१ मोजमापित ७५.१२ चौ. मीटर समतुल्य ८०८.५९ चौ. फूट (चटई) क्षेत्रफळ, १ ला मजला, बिल्डींग यझारिना वन/ विंग सी चा भाग म्हणून विकास प्रकल्प रूस्तमजी यझारिना यांच्या २ (दोन) कार पार्किंग जागा यांच्यासह जमिन धारक प्लॉट क्र. ७३९ ते ७४२, दादर माटुंगा (दक्षिण) इस्टेट योजना क्र. ५, बृहन्मुंबई महानगरपालिका व सी. एस. क्र. ५५२/१०, ५५३/१०, ५५४/१० व ५५५/१० धारक माटुंगा विभाग येथील रोड क्र. ५, दादर पारसी कॉलनी, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथील वहिवाट हक्क यांच्या मध्ये फ्लॅट क्र. २, तळ मजला, एक जोडलेले गॅरेज एन. डी. एफ. कामा बिल्डींग येथील प्लॉट क्र. ७३९, दादर माटुंगा (दक्षिण) इस्टेट योजना क्र. ५ व धारक सी. एस. क्र. ५५५/१० माटुंगा विभाग येथील रोड क्र. ५, दादर पारसी कॉलनी, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथील नोंदणीकरण जिल्हा व उप जिल्हा मुंबई शहर.

दि. ०८ ऑक्टोबर, २०२०

सही/-
हरेश मोटवानी
वकील

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील हे कंपनीज ॲक्ट, १९५६ च्या तरतुदी अंतर्गत स्थापित कंपनी, लोटस गृहनिर्माण प्रायव्हेट लिमिटेड आणि ज्याचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता आहे, १३०१, लोटस ट्रेड सेंटर, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३ यांच्याकडुन खालील नमुद युनिट खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

सर्व व्यक्तींना खालील नमूद परिसर किंवा त्यावरील कोणत्याही भागावर कोणताही दावा, हक्क, नामाधिकार आणि/किंवा हितसंबंध जसे की, कोणताही करार, विक्री, हस्तांतर, गहाण, प्रभार, धारणाधिकार, भार, बक्षीस, सोडुन देणे, अदलाबदल, सुविधाधिकार, हक्क, शर्ती, कुळवहिवाट, अभिहस्तांतरण, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, लिव्ह ॲण्ड लायसन्स, उपयोग, विकास हक्क, संयुक्त उपक्रम, ताबा, विभागणी, विश्वस्त, वारसाहक्क, थकबाकी कर, निर्वाह, जप्ती, लिसपेंन्डस आणि/किंवा त्यांच्या ताब्यामधील असलेल्या नामाधिकाराचे मुळ कागदपत्र किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे लिखित कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्य प्रतींसह त्यांचे कार्यालय २रा मजला, भाग्योदया बिल्डिंग, ७९, नागिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई-४०० ०२३ या तारखेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, अन्यथा तशा दाव्यांच्या संदर्भाशिवाय व्यवहार पूर्ण केला जाईल आणि सदर दावे त्यागित समजले जातील.

वरिल उल्लेखित परिशिष्ट:

जिल्हा डी.एन. नगर, अंधेरी (प.), मुंबई-४०००५३ येथे स्थित आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील गाव अंधेरी, तालुका अंबिवलीच्या सीटीएस क्र. १९५ (भा.) ला जोडलेल्या आणि सर्व्हे क्र. १०६-ए धारक जमिनीवर बांधकामित लोटस लिंक स्केअर अशा ज्ञात कमर्शियल बिल्डिंगमधील मेकॅनिकल पार्किंग फॉर्म मधील २ कार पार्किंग क्षेत्र आणि १६व्या मजल्यावरील (म्हणजेच मंजुर प्लॅनप्रमाणे १३वा मजला) युनिट क्र. १६०३.

मे. मार्कंड गांधी आणि कं. करीता
सही/-
वकील आणि सॉलिसिटर्स

दिनांक ८ ऑक्टोबर, २०२०

जाहीर सूचना

याद्वारे सूचित केले जाते की श्री. सौरभ खाबिया आणि श्री. कमल कुमार खाबिया (मालक) हे खालील अनुसूचीमध्ये वर्णित मिळकत आमच्या अशीलाला विकू इच्छितात. मालकांनी अभिवेदन केले आहे की मे. विजयआशीष ज्वेल्स, एक स्वामित्व संस्था, यांनी त्यांचे मालक श्री. आशीष खाबिया यांच्यामार्फत ॲक्सिस बँक लि. कडून संपत्तिवर कर्ज घेतले आहे व मालक हे श्री. आशीष खाबिया यांच्यासाठी जामिनदार आहेत व कर्जाच्या परतफेडीसाठी प्रतिभूति म्हणून संपत्तिचा हक्कविलेख ॲक्सिस बँकेकडे जमा केलेला आहे. मालकांने पुढे अभिवेदन केले आहे की ते मिळकतीचे एकमेव मालक आहेत आणि संपत्ति ही ॲक्सिस बँकेच्या प्रभाराव्यतिरिक्त इतर सर्व भारांपासून मुक्त आहे. खालील अनुसूचीमध्ये उल्लेखित संपत्तिवर कोणत्याही व्यक्तीचा विक्री, गहाणखत, भाडेपट्टी, विनिमय, देणगी, हस्तांतरण, नियुक्ति, धारणाधिकार, लायसन्स, कूळवहिवाट, प्रभार, न्यास, निर्वाह, वारसाहक्क, अधिभोग, कब्जा किंवा इतर प्रकारे कोणताही दावा असल्यास त्यांने या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकर्त्यास त्यांच्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावे, अन्यथा असे दावे किंवा आक्षेपांचा अधित्याग आणिकिंवा परित्याग केल्याचे आणि दावा अस्तित्वात नसल्याचे मानले जाईल व आमचे अशील मिळकतीचा व्यवहार यथोचित प्रकारे पुढे नेतील.

वर उल्लेखित अनुसूची:

परळ-शिवडी विभाग, मुंबई शहर जिल्हा, डॉ. एस. एस. रोड, परळ, मुंबई-४०००१२ येथील सीटीएस क्र. ५/१०८ (भाग), १११ (भाग), १/११० (भाग) धारक भूखंडावर स्थित कल्पतरू हॅबिटाट को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. येथील कल्पतरू हॅबिटाट नावाच्या इमारतीच्या ए विंगमध्ये २च्या मजल्यावरील ११२५ चौ.फूट अर्थात १०४.५२ चौ. मीटर बिल्ट-अप एरिया मोजमापित क्र. २२ धारक सदनिका ही निवासी जागा व कल्पतरू हॅबिटाटच्या पार्किंग लॉटमधील ३च्या पातळीवर १२० चौ.फूट अर्थात ११.१५ चौ. मीटर मोजमापित क्र. टी-६८ धारक १ स्टिल्ट कार पार्किंगची जागा, तसेच कल्पतरू हॅबिटाट को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.च्या शेअर सर्टिफिकेट क्र. ६ मधील अनन्य क्र. २६-३० व दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. ५०/- व एकूण किंमत रू. २५०/- असलेले पूर्ण किंमतीचा भरणा झालेले पाच शेअर्स.

आज दिनांक ८ ऑक्टोबर २०२० रोजी

वी लॉ पार्टनर्स साठी,
सही/-
विवेक दासवानी, भागीदार
८४-सी, मित्तल टॉवर्स, टॉवर सी,
८वा मजला, २१०, नरीमन पॉइंट,
मुंबई-४०००२१.
ईमेल: admin@vlawpartners.com

फॉर्म बी
जाहीर उद्घोषणा

(द इन्सॉल्वन्सी ॲण्ड बँक्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन) रेग्युलेशन्स २०१६ च्या रेग्युलेशन १२)
आशापुरा इंटिमेट्स फॅशन लिमिटेडच्या स्टेकहॉल्डर्सच्या माहितीसाठी

अ. क्र.	तपशील	वर्णन
१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**आशापुरा इंटीमेट्स फॅशन लिमिटेड**
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	१७.०७.२००६
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	कंपनी प्रबंधक-मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/ कॉर्पोरेट कर्जदाराना लिमिटेड लायबिलीटी आयडेंटिफिकेशन क्र.	एल१७२९९एमएच२००६पीएलसी१६३१३३
५	कॉर्पोरेट कर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	शॉप क्र. ३-४, तळ मजला, पॅसिफिक प्लाझा, प्लॉट क्र. ५०७, टीपीएस IV, बी. एस. रोड लगत, माहिम विभाग, दादर-पश्चिम, मुंबई-४०००२८.
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी प्रक्रिया बंद होण्याची तारीख	२४ मार्च, २०२०
७	नादारी निर्णय प्रक्रिया सुरू होण्याची तारीख	५ ऑक्टोबर, २०२०
८	परिसमापक म्हणून कृती करणारे नादारक व्यवसायिक नाव आणि नोंदणीकृत क्रमांक	भावेश राठोड आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१२००/२०१८-१९/११९१०
९	मंडळात नोंदणीकृत असलेला समापकाचा पत्ता आणि इमेल	ए/१०१, शेल्टर सीएचएसएल, सीएससी रोड, शक्ती नगर समोर, दहिसर (पू), मुंबई-४०० ०६८. bhavesh76@gmail.com
१०	समापकासह पत्रव्यवहार करण्यासाठ असलेला पत्ता आणि इमेल	टीआरसी कॉर्पोरेट कन्सल्टींग प्रा. लि., ५०२, मॅरेथॉन आयकॉन, गणपतराव कदम मार्ग लगत, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क समोर, लोअर परेल, मुंबई-४०००१३. liquidation.ashapura@gmail.com
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	४ नोव्हेंबर, २०२०

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई बेंचने कोडच्या कलम ३३ (१) अन्वये ०५ ऑक्टोबर, २०२० **आशापुरा इंटिमेट्स फॅशन लिमिटेड**च्या विरोधात नादारी प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे.

आशापुरा इंटिमेट्स फॅशन लिमिटेड स्टेकहॉल्डर्सना बाब क्र. १० च्या समोरील पत्त्यावर परिसमापकांकडे ४ नोव्हेंबर, २०२० रोजी किंवा पूर्वी त्यांच्या पुरावेसहित दावे सादर करण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे. वित्तीय धनकोंनी त्यांच्या पुरावेसहित दावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. सर्व इतर धनकों, व्यक्तिश:, टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या पुरावेसहित दावे सादर करू शकतात.

चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.

सही/-
परिसमापकाचे नाव आणि सही
भावेश राठोड

दिनांक : ०८ ऑक्टोबर, २०२०
ठिकाण : मुंबई

जाहीर सूचना

बाबानी इन्व्हेस्टमेंट ॲंड ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड
(सीआयएन : यु६५९९०एमएच१९९०पीटीसी०५५४९५)
मल्टी सॅटको इन्व्हेस्टमेंटस प्रायव्हेट लिमिटेड
(सीआयएन : यु६५९९०एमएच१९९१पीटीसी०६००४९)
मनीमार्ट सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड
(सीआयएन : यु६७१२०एमएच१९९५पीटीसी०८६५६३)

नों.का.- ७, सतगुरु हाऊस सीएचएसएल, सी/१०४७, शर्ली राजन रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५०, महा.
दू : +९१-९८२१११९९७३ / **ईमेल :** vijay3070@yahoo.com/ moneymsecurities@gmail.com

फॉर्म नं. सीएए.२
[(कलम २३०(३) आणि नियम ६ व ७ ला अनुसरून)]
सी. ए. (सीएए)/१०४९/एमबी-I/२०२०
आणि
बाबानी इन्व्हेस्टमेंट ॲंड ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी क्र. २)
यांच्या
मनीमार्ट सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरिती कंपनी)
शी एकत्रिकरणाच्या योजनेत
समभागधारक आणि प्रेफरन्स भागधारक यांच्या सभांची सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, दिनांक १५ सप्टेंबर, २०२० च्या एका आदेशाने, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठाने पहिल्या व दुसऱ्या अर्जदार कंपनीचे तिसऱ्या अर्जदार कंपनीशी आणि त्यांच्या संबंधित भागधारक व धनको यांच्यातील व्यवस्थेची प्रस्तावित योजना विचारांत घेऊन योग्य वाटल्यास सुधारणांसह किंवा शिवाय मंजुर करण्याकरिता अर्जदार कंपन्यांच्या समभागधारक आणि प्रेफरन्स भागधारकांच्या वेगवेगळ्या सभा घेण्याचे निर्देश दिले.

सदर आदेश आणि त्यामधील निर्देशानुसार याद्वारे पुढे सूचना देण्यांत येते की, अर्जदार कंपनीच्या समभागधारकांची आणि प्रेफरन्स भागधारकांची सभा २३ ऑक्टोबर, २०२० रोजी ७, सतगुरु हाऊस सीएचएसएल, सी/१०४७, शर्ली राजन रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५०, महा येथे खालील पद्धतीने होईल :

हस्तांतरक कंपनी क्र. १ च्या समभागधारकांची सभा	स. ११.०० वा (भाप्रवे)
हस्तांतरक कंपनी क्र. २ च्या समभागधारकांची सभा	स. ११.३० वा (भाप्रवे)
हस्तांतरक कंपनीच्या समभागधारकांची सभा	दु. १२.०० वा (भाप्रवे)
हस्तांतरक कंपनीच्या प्रेफरन्स भागधारकांची सभा	दु. १२.३० वा (भाप्रवे)

सदर समभागधारक आणि प्रेफरन्स भागधारक जे कोणी असतील त्यांनी कृपया हजर राहावे.

एकत्रिकरणाची सदर योजना आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० व २३२ अंतर्गत निवेदनाच्या विनामूल्य प्रती हस्तांतरिती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून मिळतील.

संबंधित सभेत हजर राहून मत देण्यास हक्कदार असलेल्या व्यक्ती, व्यक्तीश: किंवा प्रतिपत्री मार्फत मत देऊ शकतात, तथापि विहित नमुन्यातील सर्व प्रतिपत्री हस्तांतरक कंपन्या आणि हस्तांतरिती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयांत त्या त्या सभांपूर्वी किमान ४८ तास अगोदर जमा केले पाहिजेत. प्रतिपत्री प्रपत्रे हस्तांतरक कंपन्या आणि हस्तांतरिती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून मिळू शकतील.

सर्व (वेगवेगळ्या) सभांचे अध्यक्ष म्हणून न्यायाधिकरणाने श्री. मंथन देसाई, व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी यांची नियुक्ती केली आहे. व्यवस्थेच्या योजनेला संबंधित सभेत मंजुरी मिळाल्यास ती त्यानंतर, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाच्या मंजुरी अधीन असेल.

सही/-
मंथन देसाई
सभांसाठी नियुक्त अध्यक्ष

ठिकाण : मुंबई
दिनांक : ७ ऑक्टोबर, २०२०

दि मालाड सहकारी बँक लिमिटेड

नोंदणी आणि मध्यवर्ती कार्यालय: ६, सुजाता, राणी सती मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७
फोन क्र. २८८३ ८६३६, २८८२ ९५८६, २८८२ ९९४८१, फॅक्स: २८८० ३५१७१
ईमेल: accounts@maladbank.com वेबसाईट : www.maladbank.com

मेन/४_८०५७ व २७_७०३९/४३०/२०२०-२१ **दिनांक : २३/०७/२०२०**

मागणी सूचना

१	**मे. मारुती गुडस् मूव्हर्स प्रा. लि.** **संचालक:** श्री. अनिल जुगलकिशोर सुरोलिया श्री. अभिजीत अनिल सुरोलिया ४१९/डी, जोशीवाडी, काळबादेवी रोड, मुंबई- ४००००२.	कर्जदार
२	**श्री. कविता अनिल सुरोलिया** ए-५०२, गोकुळ हाईटस्, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१.	हमीदार क्र. १
३	**सौ. परमात्मादेवी जुगलकिशोर सुरोलिया** ए-५०३, गोकुळ हाईटस्, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१.	हमीदार क्र. २
४	**श्री. अनिल जुगलकिशोर सुरोलिया** ए-५०२, गोकुळ हाईटस्, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१.	हमीदार क्र. ३
५	**श्री. अनिल जुगलकिशोर सुरोलिया** ए-५०२, गोकुळ हाईटस्, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१.	हमीदार क्र. ४
६	**मे. मारुती ऑन बोर्ड कुरियर सर्व्हिसेस प्रा. लि.** ४१९/डी, जोशीवाडी, काळबादेवी रोड, मुंबई- ४००००२.	हमीदार क्र. ५ आणि गहाणदार

महोदय/महोदया,

विषय: सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना.

संदर्भ: तुमचे आमच्या मेन ब्रांचमधील मुदत ओव्हरड्राफ्ट खाते क्र. २७/७०३९ आणि मुदत कर्ज खाते क्र. ४/८०५७

तुम्ही क्र. १ यांनी वित्तीय सहाय्यासाठी आम्हाला संपर्क केलात आणि तुमच्या विनंतीनुसार आम्ही **खाते क्र. २७/७०३९ अंतर्गत रु. ७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख मात्र) ओव्हरड्राफ्ट मर्यादा आणि खाते क्र. ४/८०५७ अंतर्गत रु. २,००,००,०००/- (रुपये दोन कोटी मात्र)** ची मुदत कर्ज मर्यादा आमच्या मेन ब्रांचमार्फत मंजुर केली.

मुदत कर्ज हे एक वर्ष कालावधी करिता मंजुर केली होती वेळोवेळी नुतणीकरण करण्यात आले होते. शेवटचे नुतणीकरण **१३.११.२०१८** नुतणीकरण करण्यात आले आणि ते दिनांक **१६.११.२०१८** रोजीच्या आमच्या मंजुरी पत्राद्वारे तुम्हाला कळविण्यात आले होते. ज्याची तुम्ही आणि सर्व हमीदारांनी पोच दिली होी. मुदत कर्ज १२० महिने कालावधीकरिता मंजुर परतावायोग्य होते. पत सुविधा या **मे. मारुती ऑन बोर्ड कुरियर सर्व्हिसेस प्रा. लि.** च्या मालकीच्या आणि मोजमापित **१५८० चौ. फू. चटई क्षेत्र, कार्यालय क्र. १, नील सागर अपार्टमेंट, टीपीएस-V, श्रध्दानंद रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०००५७ च्या नोंदणीकृत गहाणाद्वारे** तारण हितसंबंध निर्माण करुन मत्तेच्या तारणांच्या सापेक्ष तुम्हाला मंजुर केल्या होत्या. तुम्ही क्र. २, ३, ४ आणि ५ हे मंजुर केलेल्या सदर पतसुविधेसाठी हमीदार आहात.

तुम्ही क्र. ६ हे तारण मत्तेचे मालक आणि पतसुविधेसाठी हमीदार आहात. तुम्ही क्र. १ हे प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आणि कर्जदार आहेत मंजुर केलेल्या पतसुविधेचा संबंधित तपशिल हा येथील खालील लिहिलेल्या परिशिष्ट ए मध्ये नमुद केलेला आहे. तुम्ही सदर करार/दस्तावेजांनुसार सदर वित्तीय सहाय्याच्या परताव्याच्या हमीसह वित्तीय सहाय्य घेतले आहे.

तुम्ही क्र. ४ यांनी तुम्ही क्र. १ यांना मंजुर केलेल्या अग्रिमांकरिता बँकेच्या नावे तारण हितसंबंध निर्माण करण्यासाठी नामाधिकार